॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

एक चागंली माता
शंभर शिक्षकांच्या मोलाची असते.

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. १८ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ४३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## SPOT NEWS

### एस. टी. बसचा प्रवास १३.५६ टक्के महागला

● **मुंबई** – राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला. या भाडेवाढीमुळे या पूर्वी केलेली साध्या बसेसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग आणि टायर यांच्या किमतीत झालेली वाढ यामुळे ही भाडेवाढ अपरिहार्य ठरली. ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आली आहे. दरम्यान, एसटी महामंडळाकडून गर्दीच्या हंगामात १० टक्के प्रवास भाडे वाढ करण्यात आली होती. ती प्रवासी भाडेवाढ १५ जुलैपर्यंत होती. मात्र, ती मुदत संपताच साध्या बसेसवरील १० टक्के भाडेवाढ ३१ जुलैपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तो निर्णय नव्याने भाडेवाढ करण्यात आल्याने रद्द करण्यात आला.

### देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन सुरू

● **नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले. ही ट्रेन जींद ते सोनीपत दरम्यान धावली. यासोबतच, हायड्रोजन इंधनावर चालणारी ट्रेन सुरू करणारा भारत जगातील पाचवा देश बनला आहे. यापूर्वी जर्मनी, फ्रान्स, स्वीडन आणि चीनमध्येच हायड्रोजन ट्रेन्स धावत आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले जींद–सोनीपत दरम्यान धावणारी ही ट्रेन जगातील सर्वात शक्तिशाली हायड्रोजन ट्रेन आहे. या ट्रेनची रचना भारतातील अभियंत्यांनी केली आहे आणि भारतातीलच कंपनीने ती बनवली आहे. १० डब्यांची ही ट्रेन जींद–सोनीपत मार्गावर १४ स्थानकांदरम्यान जास्तीत जास्त ७५ किमी प्रति तास वेगाने धावेल. याचे भाडे ५ ते २५ रुपयांच्या दरम्यान ठेवण्यात आले आहे. ट्रेन ८९ किलोमीटरचा प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण करेल. पंतप्रधान मोदींनी एलिव्हेटेड रेल्वे ट्रॅक, दोन वैद्यकीय महाविद्यालयांसह ८ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली. पंतप्रधानांनी जींद आणि हरियाणातील लोकांच्या स्वच्छता अभियानातील सहभागाचे कौतुक केले. ते म्हणाले की, गेल्या एका आठवड्यापासून ते सोशल मीडियावर स्वच्छता अभियान पाहत होते. त्यांनी लोकांना सांगितले की, स्वच्छतेसाठी त्यांच्या येण्याची वाट पाहू नये. जर जींदच्या लोकांनी संकल्प केला, तर स्वच्छतेला आपला स्वभाव आणि संस्कार बनवून दररोजच्या जीवनाचा भाग बनवू शकतात.

# शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत जाण्याची चर्चा शिगेला

## जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याची चर्चा







● **मुंबई । वीरभूमी–**
गेल्या काही दिवसांपासून शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीए आघाडीत सामील होणार आणि जयंत पाटील यांना राज्याचे अर्थमंत्रीपद मिळणार, अशा चर्चांनी जोर धरला आहे. त्या अनुषंगाने जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने या चर्चेला आणखीनच बळकटी मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी भाष्य केले.

एकनाथ शिंदे आणि जयंत पाटील यांच्या भेटीमागे कोणतेही वेगळे राजकीय समीकरण असेल, असे वाटत नाही. जयंतराव हे महाराष्ट्राच्या राजकारणातील मुरब्बी राजकारणी आहेत. ते सातवेळा विधिमंडळातून निवडून आले आहेत. त्यांनी दीर्घकाळ राज्याचे नेतृत्व केले आहे. ते मुख्यमंत्र्यांना वेगळ्या कारणासाठी भेटू शकतात. मला या भेटीत काही वावगे वाटत नाही. शरद पवार हे गेली अनेक वर्षे राज्य आणि केंद्रातील राजकारणाचा प्रमुख घटक राहिले आहेत. त्यांचा पक्षही राष्ट्रीय स्तरावर आहे. त्यामुळे पवार साहेबांच्या पक्षाला त्यांच्या पद्धतीने वाटचाल करण्याचा आणि कोणासोबत जायचे हा निर्णय घ्यायचा अधिकार असल्याचे मत सुनील तटकरे यांनी व्यक्त केले. ते शुक्रवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी सुनील तटकरे यांनी जयंत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अनुषंगाने घडत असलेल्या राजकीय घडामोडींविषयी सविस्तर भाष्य केले. एकनाथ शिंदे हे राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थखाते मिळू नये, यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी ते अमित शाह यांना भेटल्याची चर्चा आहे. यावर आपले मत काय असा प्रश्न सुनील तटकरे यांना विचारला असता त्यांनी म्हटले की, मला स्वत:ला वाटते की, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत, त्यांनी यापूर्वी मुख्यमंत्रीपद उत्तम पद्धतीने भुषविले आहे. ते इतर पक्षाला विशिष्ट विभाग देऊ नये, असे बोलतील हे मला स्वत:ला वाटत नाही. एकनाथ शिंदे हे त्यांच्या पद्धतीने राजकारण करणारे नेते आहेत. मित्रपक्षाला काय मिळावं, मिळू नये, असे ते मला बोलल्याचं गेल्या तीन वर्षांमध्ये मला कधी जाणवले नाही. ते जे पाऊल उचलतात, त्याला यश मिळते. ते त्यांचे कर्तृत्व त्या पद्धतीने दाखवतात. राष्ट्रवादीशी सौहार्दाचे संबंध आहेत असे सुनील तटकरे यांनी म्हटले.

यावेळी सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा अर्थखात्यावरील दावा पुन्हा एकदा सांगितला. अर्थखाते राष्ट्रवादीला मिळावे, ही आमची मागणी आहे. सुनेत्रा पवारांच्या नेतृत्त्वाखाली आम्ही यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटणार आहोत. ती भेट झाल्यावर आम्हाला इतर बाबींवरही चर्चा करायची आहे, असे सुनील तटकरे यांनी म्हटले. पवार साहेबांच्या पक्षातील सहकाऱ्यांच्या सत्तेतील सहभागाच्या चर्चा आहेत. पण मला याबाबत माहिती नाही. शेवटी सहा दशकं केंद्र आणि राज्याच्या राजकारणात पवार साहेबांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. त्यांच्या पक्षाला त्यांच्या पद्धतीने वाटचाल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांच्या पक्षाने कोणासोबत जावे, हा त्यांचा प्रश्न आहे असेही सुनील तटकरे यांनी म्हटले.

### महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ

■ सुनेत्रा पवार यांना अंधारात ठेवून तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी वर्षा बंगल्यावर देवेंद्र फडणवीस आणि जयंत पाटील यांची भेट घेतल्याची जोरदार चर्चा महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात आहे. यानंतर बुधवारी रात्री पार्थ पवार यांनी तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. या भेटीत इथून पुढे घटकपक्षातील कोणत्याही नेत्याची भेट घेताना सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांना कळवले जाईल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. याबाबत सुनील तटकरे यांना प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी म्हटले की, पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आहेत ते संसदेतील खासदार आहेत. ते देवेंद्र फडणवीस यांना भेटू शकतात. त्यामध्ये वावगं वाटण्याचं कारण नाही. ते प्रशासकीय कामासोबत संघटनेच्या कामाची चर्चा करत असले तरी वेगळे वाटण्याचे कारण नाही असेही सुनील तटकरे यांनी म्हटले.

### शिंदेंचा अर्थखात्याला विरोध नाही

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अर्थखाते राष्ट्रवादीला मिळू नये म्हणून अमित शहा यांची भेट घेत असल्याच्या चर्चेवरही त्यांनी स्पष्टीकरण दिले. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपद उत्तमरीत्या भूषवले आहे. ते दुस–या पक्षाला विशिष्ट खाते देऊ नका असे म्हणतील, असे मला वाटत नाही. मित्रपक्षांशी त्यांचे संबंध सौहार्दाचे आहेत. सुनील तटकरे यांनी अर्थखात्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचाच दावा असल्याचे पुन्हा एकदा ठणकावून सांगितले. अर्थखाते राष्ट्रवादीलाच मिळावे ही आमची आग्रही मागणी आहे. याच आणि इतर प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आम्ही पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्त्वाखाली लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत.

# कागदाऐवजी आता येणार प्लास्टिकच्या नोटा

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**
डिजिटल पेमेंट आणि यूपीआय व्यवहारांचा वापर देशात मोठ्या प्रमाणात वाढला असला, तरी रोखीचे व्यवहार आजही कायम आहेत. अशातच भारतीय चलनी नोटांबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाशी (आरबीआय) संबंधित नोट छपाई कंपनीने पॉलिमर शीट खरेदीसाठी प्रक्रिया सुरू केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे भारतात भविष्यात पॉलिमर अर्थात प्लास्टिक नोटा पाहायला मिळणार का, याची चर्चा सुरू झाली आहे.

मात्र, पॉलिमर शीट खरेदीची प्रक्रिया सुरू झाली म्हणजे सध्याच्या १०, २०, १००, २०० किंवा ५०० रुपयांच्या नोटा तातडीने बदलल्या जाणार, असा त्याचा अर्थ होत नाही. याबाबत अंतिम निर्णय आणि अधिकृत घोषणा होणे अद्याप बाकी आहे. सध्या नागरिकांनी घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. पॉलिमर नोटांसंदर्भातील प्रक्रिया म्हणजे सध्याच्या नोटा लगेच चलनातून बाद होणार किंवा बदलून घ्याव्या लागणार, असे नाही. पॉलिमर नोटा आणण्याचा अंतिम निर्णय झाल्यास आरबीआयकडून त्याबाबत अधिकृत घोषणा केली जाईल. कोणत्या मूल्याच्या नोटा पॉलिमरमध्ये छापल्या जातील, त्या कधी बाजारात येतील आणि सध्याच्या नोटांचे काय होईल, याची माहितीही त्यानंतरच स्पष्ट होईल.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेड अर्थात बीआरबीएनएमपीएलने चलनी नोटांसाठी वापरल्या जाणा–या पॉलिमर सब्स्ट्रेटसंदर्भात प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी जगभरातील पात्र कंपन्यांकडून एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट मागवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. पॉलिमर सब्स्ट्रेटचा वापर कागदाऐवजी अधिक टिकाऊ चलनी नोटा तयार करण्यासाठी केला जातो. त्यामुळे या प्रक्रियेकडे भारतातील पॉलिमर नोटांच्या संभाव्य वापराच्या दृष्टीने पाहिले जात आहे.

बीआरबीएनएमपीएल म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण प्रायव्हेट लिमिटेड ही आरबीआयची पूर्ण मालकी असलेली उपकंपनी असून देशातील चलनी नोटांच्या छपाईमध्ये तिची महत्त्वाची भूमिका आहे. पॉलिमर सब्स्ट्रेटसाठी एडक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे भारतात अशा नोटांच्या वापराच्या शक्यतांवर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. मात्र, कोणत्या मूल्याच्या नोटांसाठी पॉलिमरचा वापर केला जाईल किंवा तो केव्हा सुरू होईल, याबाबत अधिकृत स्पष्टता आवश्यक आहे.

सामान्य चलनी नोटा प्रामुख्याने विशेष प्रकारच्या कागदी किंवा कापूस–आधारित सामग्रीपासून तयार केल्या जातात. पॉलिमर नोटा मात्र विशेष प्रकारच्या सिंथेटिक मटेरियलपासून तयार केल्या जातात. सामान्य भाषेत त्यांना प्लास्टिक नोटा म्हटले जाते. जगातील काही देशांमध्ये पॉलिमर नोटांचा वापर केला जातो. या नोटांमध्ये पारदर्शक विंडोसारखी आधुनिक सुरक्षा वैशिष्ट्ये समाविष्ट करणे शक्य असल्याने बनावट नोटांविरोधातील उपायांसाठीही हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते.

कागदी नोटांच्या तुलनेत पॉलिमर नोटा अधिक काळ टिकू शकतात. वारंवार वापरामुळे नोटा फाटणे किंवा खराब होण्याचे प्रमाण तुलनेने कमी राहू शकते. पाणी आणि ओलाव्याचा परिणामही अशा नोटांवर कमी होतो. दीर्घकाळ वापरता येत असल्याने वारंवार नवीन नोटा छापण्याची गरज कमी होऊ शकते. मात्र, त्यांचा उत्पादन खर्च, पुनर्वापर आणि पर्यावरणीय परिणाम यासारख्या बाबींचाही विचार करावा लागतो.

# अकोले नगरपंचायतीत बाळासाहेब वडजे यांच्या विरोधातील अविश्वास ठराव १२-० ने मंजूर

**पाच नगरसेवक अनुपस्थित । नगराध्यक्षपदासाठी सोनाली नाईकवाडी यांच्या नावाची चर्चा**



● **अकोले । वीरभूमी–**
अकोले नगरपंचायतीचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्याविरोधातील अविश्वास ठराव आज विशेष सभेत एकमताने मंजूर झाला. उपस्थित १२ नगरसेवकांनी ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने ठराव १२ विरुद्ध ० अशा मतांनी मंजूर झाला. या वेळी भाजपचे चार आणि काँग्रेसचे एक असे एकूण पाच नगरसेवक अनुपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आज सकाळी ११ वाजता नगरपंचायत सभागृहात विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले, तर मुख्याधिकारी धनश्री पवार यांनी त्यांना सहकार्य केले.

सभेला भाजपचे ८, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे २ आणि शिवसेनेचे २ असे एकूण १२ सदस्य उपस्थित होते. नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांच्याविरोधातील अविश्वास ठराव हात वर करून आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला.

यावेळी तमन्ना मोहसीन शेख, सोनाली नाईकवाडी, कविता शेळके, माधुरी शेणकर, प्रतिभा मनकर, जनाबाई मोहिते, श्वेताली रुपवते, विमल मंडलिक, नवनाथ शेटे, सागर चौधरी, आरिफ शेख आणि हितेश कुंभार यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले.

तर नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, शीतल वैद्य, वैष्णवी धुमाळ (भाजप) तसेच काँग्रेसचे नगरसेवक प्रदीप नाईकवाडी हे सभेला अनुपस्थित होते.

बैठकीनंतर उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, एकूण सदस्यसंख्येच्या दोन–तृतीयांशपेक्षा अधिक सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केल्याने नगराध्यक्षांविरोधातील ठराव मंजूर झाला आहे.

अविश्वास ठराव मंजूर झाल्यामुळे नगराध्यक्षपद रिक्त झाले असून, जिल्हाधिकारी लवकरच नव्या नगराध्यक्ष निवडीचा कार्यक्रम जाहीर करणार आहेत. दरम्यान, पुढील नगराध्यक्ष म्हणून सोनाली नाईकवाडी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून, त्यांची निवड होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना

**पदाधिकाऱ्यांचा शपथविधी संपन्न । नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व प्रमाणपत्रांचे वितरण**

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**
येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त बुधवारी (दि. १५ जुलै २०२६) करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात पार पडला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची करिअर संसद यापूर्वी दि. ३० जून रोजी स्थापन करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त प्रा. सुरेशजी रसाळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कला विद्याशाखाप्रमुख प्रा. बाळासाहेब महारनुर यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी करिअर कट्टा समन्वयक डॉ. विजय इथापे यांनी प्रास्ताविकातून करिअर संसदेच्या उद्दिष्टांबाबत माहिती दिली. यावेळी निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नेतृत्वगुणांच्या जोपासनेसाठी आपल्या पदाला न्याय देण्याची




शपथ सर्व पदाधिकाऱ्यांनी घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सुर्यवंशी आणि डॉ. विलास सुद्रिक यांनी कार्यक्रमाचे पूर्वनियोजन करत विद्यार्थ्यांची ऑनलाइन बैठक घेऊन विविध जबाबदाऱ्या सोपवल्या तसेच करिअर संसदेच्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये सार्थक डोंबे (मुख्यमंत्री), गणेश गुप्ता (नियोजन मंत्री), करीम पठाण (कायदा व शिस्त पालन मंत्री), सानिका हेंद्रे (सामान्य प्रशासन मंत्री), तृप्ती लोखंडे (माहिती व प्रशासन मंत्री), ऋषिकेश महांडुळे (उद्योजकता विकास मंत्री), रोहित निंभोरे (रोजगार व स्वयंरोजगार मंत्री), वैष्णवी आहेर (कौशल्य विकास मंत्री), ऋतुजा काकडे (संसदीय विकास मंत्री) आणि सार्थक भोईटे (संसद सदस्य) यांचा समावेश आहे.

महाविद्यालयाच्या करिअर कट्टा उपक्रमाला आतापर्यंत शासनाचे एकूण १६ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच सन २०२५ मध्ये उल्लेखनीय कार्याबद्दल करिअर संसदेस उत्कृष्ट करिअर संसद पुरस्कार मिळाला होता. सन २०२६ मध्येही उत्साहाने व समर्पित भावनेने कार्य करण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, उपाध्यक्ष सौ. मेघाताई संदीप औटी, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त, निरीक्षक सचिनराव लगड तसेच अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संसद विद्यार्थी सार्थक डोंबे आणि करीम पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश गुप्ता यांनी केले.

# एकनाथ शिंदेंनी सुरू केलेली मोफत साडी योजना सरकारने गुंडाळली

● **मुंबई । वीरभूमी –**
तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील अन्त्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी सुरु केलेली मोफत साडीची योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुंडाळली आहे. वस्त्रोद्योग विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला.

वस्त्रोद्योग विभागाच्या विविध योजना, विविध घटकांना दिले जाणारे अर्थसहाय्य, प्रस्तावित योजनांचा आर्थिक भार आणि इतर दायित्वे यांचा विचार करता कॅप्टिव्ह मार्केट योजना पुढील आर्थिक वर्षात सुरु ठेवणे संयुक्तिक दिसत नसल्याने मोफत साडीची योजना सन २०२६–२७ या आर्थिक वर्षापासून बंद करण्यात येत असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. शिंदेंच्या नेतृत्वातील सरकारने आनंदाचा शिधा, मुख्यमंत्री अन्नपूर्णा, वयोश्री, ज्येष्ठ नागरिक तीर्थाटन, शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा अशा अनेक लोकप्रिय योजना जाहीर केल्या होत्या. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व योजना एकापाठोपाठ बंद केल्या. आता अन्त्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी सणाच्यावेळी दरवर्षी एक साडी देण्याची योजनाही बासनात गुंडाळण्यात आली आहे.

राज्य यंत्रमाग महामंडळाने १ साडी ३५५ रुपयांना खरेदी केली. तसेच या योजनेसाठी साड्यांचे उत्पादन, वाहतूक, जाहीरात, प्रसिद्धी, साठवणूक, हमालीसाठी येणारा खर्च महामंडळाला राज्य सरकारकडून देण्यात आला. ही योजना २०२३ ते २०२८ अशा पाच वर्षांसाठी निश्चित करण्यात आली होती. मात्र, योजेनचा कालावधी पूर्ण होण्याआधीच ती बंद करण्यात आली.

### लाडक्या बहिणीची साडीही महायुतीला परवडली नाही : रोहिणी खडसे

■ रोहिणी खडसे म्हणाल्या की, भाऊराया देवेंद्र फडणवीसजी आणि एकनाथ शिंदे साहेब, २१००–१५०० सोडा, आता लाडक्या बहिणींसाठी तुम्हाला साडीही परवडेनाशी झाली? निवडणुकीपूर्वी महिलांना विविध योजनांची आश्वासने देण्यात आली, घोषणा करण्यात आल्या आणि आश्वासनांचा पाऊस पाडण्यात आला. मात्र आता आर्थिक तुटवड्याचे कारण पुढे करून एकामागून एक योजना बंद केल्या जात आहेत. जर राज्याची आर्थिक स्थिती इतकीच बिकट होती, तर निवडणुकीत ही आश्वासने कोणत्या हिशेबाने देण्यात आली होती? तुम्ही तर इस्टेटसाठी बहिणीला खोटे आश्वासन देऊन हक्कसोड पत्र मिळवणाऱ्या भावापेक्षाही वाईट आहात. आधी मतांसाठी विविध आश्वासने दिली आणि आता निवडणुका संपल्यानंतर तीच आश्वासने व योजना काढून घेत आहात अशी टीका त्यांनी केली.

SPOT NEWS

## अकोले काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी शिवाजी नेहे यांची फेरनिवड

**अकोले । वीरभूमी –**

संघटन सृजन अभियाना अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निरीक्षकांनी जिल्ह्यांमध्ये भेटी देऊन जिल्ह्यातील काँग्रेस नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून ब्लॉक अध्यक्ष म्हणजेच तालुकाध्यक्ष यांचे नियुक्ती संदर्भात प्रदेश कार्यालयाकडे दिलेल्या शिफारशी विचारात घेता तसेच प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून व अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटी सदस्य बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुका काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी शिवाजी गोविंदराव नेहे यांची पुन्हा नव्याने नियुक्ती करण्यात आली. शिवाजी नेहे यांनी यापूर्वी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अकोले तालुकाध्यक्ष पदाच्या काळात माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शनातून व ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्यात काँग्रेस पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम त्यांनी मागील दोन वर्षांपासून केले आहे. काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे सर्व सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. अनेक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले. त्यांच्या कामाची पावती म्हणून वरीष्ठ नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी शिवाजी नेहे यांच्यावर तालुकाध्यक्ष पदाची पुन्हा जबाबदारी दिली असे समजते. शिवाजी नेहे यांचे या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## शेतात एकटी असताना विवाहितेवर अत्याचार; आरोपीविरुद्ध पाथर्डी पोलिसांत गुन्हा दाखल

**पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील कोरडगाव शिवारात उसाच्या शेतात कामासाठी गेलेल्या एका २८ वर्षीय विवाहितेवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिस ठाण्यात संशयित आरोपी गणेश बाळासाहेब म्हस्के (रा. खंडोबाचीवाडी, ता. पाथर्डी) याच्याविरुद्ध बलात्कारासह जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जुलै रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी महिला कोरडगाव शिवारातील उसाच्या शेतात काम करत होती. त्यावेळी आरोपी तेथे आला. सुरुवातीला त्याने महिलेशी बोलण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर तिचा पती बाहेरगावी गेल्याचे समजताच आरोपीने अश्लील बोलत महिलेला तू मला आवडतेस असे म्हणत जबरदस्ती केली. फिर्यादीनुसार, आरोपीने महिलेला खाली पाडून तिच्यावर इच्छेविरुद्ध लैंगिक अत्याचार केला. तसेच ही घटना कोणाला सांगितल्यास तुला व तुझ्या पतीला जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घटनेनंतर घाबरलेल्या महिलेने घरी जाऊन कुटुंबीयांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर पतीला माहिती देऊन पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी पाथर्डी पोलिसांनी संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील बलात्कार व धमकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सुरू झालेल्या या तीन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर प्रतीकात्मक चाल देऊन करण्यात आले. यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, अमोल घोलप, डॉ. अमोल तांबे, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, अनुराधा बापट, प्रकाश गुजराथी, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, संजय खडके, स्वप्निल भगूरकर, नवनीत कोठारी, मनीष जसवानी, सनी गुगळे, चेतन कड, अतुल कोठारी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, दीपक चव्हाण, विजय ढाले, डी. बी. चौरे, शार्दुल टापसे, देवेंद्र ढोकळे, शिरीष इंदलकर, प्रशांत धंगेकर यांच्यासह खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात सचिव यशवंत बापट यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, या स्पर्धेसाठी आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, जम्मू-काश्मीर तसेच महाराष्ट्र राज्यातून ३८० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून बुद्धिबळ क्षेत्रातील नरेंद्र फिरोदिया यांच्या योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या नावाने सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत अवघ्या पाच वर्षांच्या बालकांपासून ते ८३ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत विविध वयोगटातील बुद्धिबळपटू सहभागी झाले असून, आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर यशाची उत्तुंग भरारी घेण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

# पुणतांबा येथील श्री याज्ञसेनी देवी मंदिराचा मराठाकालीन शिलालेख

**गोदावरी तिरावरील मंदिरातील मंदिरातील गणेशपट्टीवर सहा ओळींचा कोरीव लेख**

**विजय उंडे**

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील गोदावरी नदीकिनारी असलेल्या श्री भगवती याज्ञसेनी देवी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीवर शके १६८७ (इ.स. १७६५) मधील एक महत्त्वपूर्ण मराठाकालीन शिलालेख कोरलेला आहे. सहा ओळींचा हा कोरीव लेख देवनागरी लिपीतील बाळबोध मराठीत असून अक्षरे स्पष्ट, सुबक व सुस्थितीत आहेत.

शिलालेखाचे वाचन

१. शके १६८७ पार्थिव नाम संवछ२. रे श्रावण श्रुध ५ तेदिनी श्री आंबे चे३. देवाल्य पुरातन होते. जीर्ण जाल. आंबे च्या४. चीतास आल म्हणनऊन नुतन केलं आबा५. जी सुत सिवाजी तस्य तनये हरबाजी बीड६. वे यांनी निर्मील?

अर्थ : शालिवाहन शक १६८७, पार्थिव नाम संवत्सर, श्रावण शुद्ध पंचमी, मंगळवार दि. २३ जुलै १७६५ रोजी प्राचीन व जीर्ण झालेल्या श्री आंबामातेच्या देवालयाचा देवीच्या इच्छेनुसार जीर्णोद्धार करून त्याचे नूतनीकरण करण्यात आले. हे कार्य आबाजी यांचे पुत्र शिवाजी व त्यांचे पुत्र हरबाजी बीडवे यांनी पूर्ण केले.



हा शिलालेख मंदिर अठराव्या शतकापूर्वीपासून अस्तित्वात असल्याचा महत्त्वपूर्ण पुरावा आहे. देवाल्य पुरातन होते, जीर्ण जाल या उल्लेखावरून मंदिराच्या प्राचीनत्वाची साक्ष मिळते, तर आंबेच्या चित्तास आल म्हणनऊन नुतन केलं या वाक्यातून तत्कालीन लोकश्रद्धा आणि भक्तिभाव प्रतिबिंबित होतो.

शिलालेखात आबाजी, शिवाजी आणि हरबाजी बीडवे या तीन पिढ्यांचा सलग उल्लेख आढळतो. त्यामुळे बीडवे घराण्याची वंशपरंपरा आणि त्यांच्या धार्मिक कार्यातील योगदान अधोरेखित होते. मराठाकालीन मंदिर संवर्धन, स्थानिक दातृत्व आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा हा एक दुर्मिळ व महत्त्वपूर्ण पुरावा आहे.

**मंदिर पायरीवरील दुसरा लेख**

वाचन : श्री हरबाजी सिवाजी रघुनाथ

या लेखावरून पुढील पिढ्यांनीही मंदिराची सेवा आणि देवस्थानाची परंपरा जपल्याचे दिसून येते.

गोदावरी तीरावरील याज्ञसेनी देवी मंदिर हे लोकश्रद्धा, कुलदैवत परंपरा आणि मराठाकालीन इतिहास यांचा संगम असलेले महत्त्वपूर्ण सांस्कृतिक केंद्र असून, येथील हा शिलालेख स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत मौल्यवान दस्तऐवज मानला जातो.

या शिलालेखाचे संशोधक, माहिती व संकलन पुणे येथील शिलालेख संशोधक अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## कोपरगावच्या वीज समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विद्युतीकरण कामांच्या नूतनीकरणाचा डीपीआर मंजूर करण्याची आ. विवेकभैय्या कोल्हे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**कोपरगाव । वीरभूमी–**

विधानसभा मतदारसंघातील कोपरगाव शहर व ग्रामीण भागामधील वीजेच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विद्युतीकरण कामांच्या नूतनीकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आ.विवेकभैय्या कोल्हे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यवाही करण्याचे आदेश देत प्रतिसाद दिला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुका व शहर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वीजेची गंभीर समस्या प्रलंबित आहे. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, वेगाने होत असलेले शहरीकरण आणि शेतीचा विस्तार यामुळे या भागातील विद्यमान वीज यंत्रणा अपुरी पडत आहे. परिणामी नागरिक आणि शेतकरी वारंवार वीजपुरवठा खंडित होणे तसेच कमी दाबाच्या वीजेचा सामना करत आहेत. या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कोपरगाव शहर व ग्रामीण भागातील विद्युतीकरणाच्या कामांना तातडीने मंजुरी देऊन ती पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे आ.विवेकभैय्या कोल्हे यांनी नमूद केले आहे.

त्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील वीज वहन क्षमता वाढविण्यासाठी उच्च दाबाच्या वीजवाहिन्यांचे नूतनीकरण करण्यात यावे, वीजेचा दाब नियंत्रित ठेवण्यासाठी अधिक क्षमतेचे नवीन रोहित्र बसविण्यात यावेत, सध्या कार्यरत असलेल्या कमी क्षमतेच्या रोहित्रांचे तातडीने क्षमतेनुसार उन्नतीकरण करण्यात यावे तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आणि तांत्रिक बिघाड टाळण्यासाठी शहरातील मुख्य वीजवाहिन्या भूमिगत करण्यात याव्यात, अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत. या सर्व कामांसाठी नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्यासमवेत मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित करण्यात यावी, अशीही मागणी आ. विवेकभैय्या कोल्हे यांनी केली आहे.

या बैठकीतून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली कोपरगावच्या विद्युतीकरणाची कामे मार्गी लागतील. तसेच गावागावांतील सर्वसामान्य वीज ग्राहक, व्यापारी, उद्योग तसेच अन्नदाता शेतकरी बांधवांना सुरक्षित, शाश्वत आणि उच्च दाबाचा दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होईल. लोकहिताच्या या महत्त्वाच्या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांना तातडीने आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती आमदार विवेक भैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीचा विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

# बाबूजी आव्हाड महाविद्यालयात कागदी पिशवी निर्मितीचे प्रशिक्षण

**एनसीसी छात्रांचा प्लास्टिकमुक्तीचा निर्धार | पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती**

**पाथर्डी । वीरभूमी–**

बाबूजी आव्हाड महाविद्यालयात पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाच्या वतीने कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या उपक्रमात एनसीसी छात्रांसह महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.



छाया । अनिल खाटेर

वाढत्या प्लास्टिक वापरामुळे मानव, पशुपक्षी, वन्यजीव आणि जलसृष्टीला मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचत आहे. त्यामुळे प्लास्टिकचा वापर टाळून कागदी व कापडी पिशव्यांचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी मार्गदर्शन करताना प्रशिक्षण घेतलेले एनसीसी छात्र आणि विद्यार्थी भविष्यात प्लास्टिकमुक्त समाजनिर्मितीसाठी तसेच कागदी व कापडी पिशव्यांच्या वापराबाबत जनजागृती करतील, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी कागदी पिशव्यांचा वापर करू, प्लास्टिकला नकार देऊ असा सामूहिक निर्धार केला.

यावेळी संस्थेचे विश्वस्त कुणाल आव्हाड, डॉ. किरण गुलदगड, प्रा. ब्रह्मानंद दराडे, डॉ. अर्जुन केरकळ, प्रा. मन्सूर शेख, प्रा. अभिजीत बोरुळे, प्रा. आशा पालवे आणि प्रा. अश्विनी एडके उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे यांनी केले.

# लेकीच्या अश्रूंनी वितळले बापाचे मन अन् दारू विक्रीला केला कायमचा रामराम

**अकोले । वीरभूमी–**

दारू विकणाऱ्याची मुलगी अशी शाळेत होणारी हेटाळणी एका चिमुरडीला सहन झाली नाही. घरी आल्यानंतर तिने आपल्या वडिलांना, बाबा, दारू विकू नका... अशी भावनिक विनंती केली. लेकीच्या अश्रूंनी आणि निरागस शब्दांनी एका बापाचे मन हेलावले. त्यांनी अवैध दारू विक्रीचा व्यवसाय कायमचा बंद करून स्वाभिमानाने मासे विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे घडलेली ही घटना समाजपरिवर्तनाचा प्रेरणादायी आदर्श ठरत आहे.

काही दिवसांपूर्वी लिंगदेव येथे गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी ग्रामसभा व दारूबंदी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महिलांनी दारूमुळे उद्ध्वस्त होत असलेल्या संसाराचे वास्तव मांडले. त्याचवेळी संबंधित दारू विक्रेत्याच्या मुलीला शाळेत दारू विकणाऱ्याची मुलगी म्हणून हिणवले जात असल्याचे समोर आले. या गोष्टीने व्यथित झालेल्या मुलीने घरी येऊन वडिलांना दारू विक्री बंद करण्याची विनंती केली.

या भावनिक प्रसंगानंतर पिनू (शंकर) आढाव यांनी तत्काळ अवैध दारू विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला आणि मासे विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. त्यांच्या या निर्णयाचे गावभर स्वागत करण्यात आले.

नव्या व्यवसायाचे उद्घाट सौ. पुष्पा लहामटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दारूबंदी चळवळीच्या वतीने हेरंब कुलकर्णी यांनी पिनू आढाव, त्यांच्या पत्नी आणि मुलीचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी बोलताना पुष्पा लहामटे म्हणाल्या, एका लहान मुलीने आपल्या वडिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला. हा निर्णय अनेक कुटुंबांसाठी प्रेरणादायी ठरेल.

दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी तालुक्यातील सर्व अवैध दारू विक्रेत्यांना दारू विक्री सोडून प्रामाणिक व्यवसाय स्वीकारण्याचे आवाहन केले. दारू विक्री सोडणाऱ्यांचा गावागावात सार्वजनिक सत्कार करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

अकोले तालुका दारूबंदी चळवळीच्या अध्यक्षा विमल मुंढे यांनी महिलांना मार्गदर्शन करताना ठाम भूमिका मांडली. त्या म्हणाल्या, आजपासून तालुक्यातील प्रत्येक महिला ही माझ्या कुटुंबातील सदस्य आहे. कोणत्याही महिलेवर अन्याय, अत्याचार किंवा दारूमुळे होणारा छळ सहन केला जाणार नाही. प्रत्येक महिलेला न्याय मिळावा यासाठी मी स्वतः लक्ष देईन. महिलांच्या प्रत्येक लढ्यात मी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीन. दारूमुक्त, सुरक्षित आणि सन्मानाने जगणारा समाज घडविण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने काम करूया. त्यांच्या या आवाहनाचे उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.



छाया । विद्याचंद्र सातपुते

ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी पिनू (शंकर) आढाव यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना भावनिक शब्दांत सांगितले, पिनूभाऊ, आपण घेतलेला हा निर्णय केवळ आपल्या कुटुंबासाठी नाही, तर संपूर्ण लिंगदेव गावासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. आपल्या धाडसी निर्णयामुळे गावाचा इतिहास बदलण्यास सुरुवात झाली आहे. भगवान लिंगेश्वरानेच आपल्याला ही सद्बुद्धी दिली असावी, याची मला खात्री आहे. आपल्या या परिवर्तनातून इतरांनाही प्रेरणा मिळेल आणि लिंगदेव लवकरच पूर्णपणे दारूमुक्त गाव म्हणून ओळखले जाईल.

या कार्यक्रमाला दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रा. मच्छिंद्र देशमुख, लिंगेश्वर देवस्थानचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या सौभाग्यवती पुष्पा लहामटे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुका अध्यक्षा नीता आवारी, लिंगदेवचे सरपंच अमित घोमल, रुंभोडीचे सरपंच रविंद्र मालुंजकर, डोंगरगावचे सरपंच दशरथ उगले, जालिंदर बोडके, ज्ञानगंगा वाचनालयाचे अध्यक्ष सदाशिव कानवडे, कैलास आरोटे, गोपीनाथ हाडवळे, ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे, लता गावडे, नंदा कातोरे, विमल मुंढे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ फापाळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जगदीश आढाव यांनी मानले.

# देवेंद्र फडणवीस हे शेतकऱ्यांच्या सुखदु:खात पाठीशी उभे असणारे एकमेव नेतृत्व

**भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे प्रतिपादन | शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार**

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व शेतकऱ्यांसह प्रत्येक नागरिकाच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा यासाठी गावागावातील शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांचे स्वप्न पूर्ण करणारे एकमेव नेतृत्व आहे. त्यामुळे राज्यातील तमाम शेतकरीवर्ग पूर्ण ताकदीनिशी देवाभाऊ सरकारच्या पाठीशी उभे आहे असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी केले.

पीक कर्जमुक्तीचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने भाजप किसान मोर्चाने मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी श्री. रविंद्र चव्हाण यांनी सभागृहाला संबोधित केले.

शेतरस्ते आणि पाणंद रस्ते, जलयुक्त शिवार अभियान, शेतीला मिळालेली -ख आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड, कृषी पंपांना भर दिवसा मोफत वीज अशा फडणवीस यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेल्या विविध निर्णय आणि योजनांचा यावेळी श्री. रविंद्र चव्हाण यांनी मागोवा घेतला. सरकारच्या कामगिरीतून शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यादरम्यान भाजप प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे यांनी राज्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी हात उंचावून आणि देवाभाऊ यांच्या नावाने जयघोष केला.

या सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सोहळ्याकडे केवळ एक सत्कार सोहळा म्हणून न पाहता शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी म्हणून पाहत असल्याचे नमूद केले. तसेच कोणतीही राजकीय निवडणूक डोळ्यांसमोर नसताना आम्ही कर्जमुक्तीचा निर्णय घेतला, कारण शेतकऱ्यांचे हित हा आमच्यासाठी राजकारणाचा विषय नाही. अनेकांना वाटत होतं सरकार कर्जमाफी करणार नाही. आपण आंदोलने करू... पण हे महायुतीचे सरकार आहे, शेतकऱ्यांच्या देवाभाऊचे सरकार आहे असंही ते म्हणाले.

७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या कृषी पंपांना भर दिवसा आणि मोफत वीज देण्यात येत आहे. या पंपांसाठी असणारे ४८ हजार कोटींचे जुने वीज बिल माफ करत असल्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली. शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्याला त्या पाटीवर नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे, या दृष्टीने घेतलेला हा निर्णय आहे असे फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामगिरीविषयी शेतकरी वर्गात समाधान असल्याचे या सोहळ्यात दिसून आले.

या सोहळ्याला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजपा किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस खा. अनिल बोंडे, आ. रणधीर सावरकर, आ. प्रवीण दरेकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस




आ. संजय कुटे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा आ. चित्रा वाघ, भाजपा महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चा अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह अनेक आमदार, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# SPOT NEWS

## ऊसतोडणी मजुरांच्या गुलामी व शोषणाविरोधात २४ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

ऊसतोडणी मजुरांवरील आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक शोषणाविरोधात संघटित जनलढा उभारण्याचा निर्धार पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'ऊसतोडणी मजूर गुलामी व शोषणविरोधी आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी दिली. ऊसतोडणी मजूर हे बहुतांश गरीब, अशिक्षित, स्थलांतरित आणि असंघटित कुटुंबांतील असतात. मुकादम, ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार आणि काही साखर कारखान्यांच्या व्यवस्थेमुळे अनेक मजूर कर्ज, आगाऊ रक्कम आणि एकतर्फी करारांच्या जाळ्यात अडकतात. ऊसतोडणीचा हंगाम सुरू झाल्यानंतर त्यांच्याकडून अत्यंत कष्टाचे काम करून घेतले जाते. मात्र योग्य मजुरी, सुरक्षित निवास, आरोग्यसेवा, अपघात विमा, महिलांची सुरक्षितता, मुलांचे शिक्षण आणि कायदेशीर संरक्षण यांकडे गंभीर दुर्लक्ष केले जाते. काही भागांत मजुरांना धमकावणे, त्यांच्या हालचालींच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणे, कुटुंबीयांना भीती दाखवणे किंवा बळजबरीने काम करून घेणे, अशा घटना व आरोप समोर येत आहेत. काही प्रकरणांत मजुरांना जबरदस्तीने दुसऱ्या ठिकाणी नेल्याच्याही तक्रारी करण्यात आल्या आहेत. अशा प्रत्येक तक्रारीची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता, बंधमजुरी पद्धती (निर्मूलन) अधिनियम, बालमजुरीविरोधी कायदे, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ॲड. गवळी यांनी केली.

## अजित भोसले यांना जीवे मारण्याच्या धमकीप्रकरणी कारवाईची मागणी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

आदिवासी युवा क्रांती संघटनेचे अध्यक्ष अजित भोसले यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तींवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या वेळी अजित भोसले, रामसिंग भोसले, नवनाथ भोसले, राहुल भोसले आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, श्रीगोंदा तालुक्यात पारधी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून समाजातील विविध सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी बेलवंडी येथे महाराष्ट्र शासनाच्या जागेवर पारधी समाजासाठी मंगल कार्यालय उभारण्याचा ग्रामसभेचा ठराव मंजूर करण्यात आला होता. संबंधित प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यात आला असून तो सध्या मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहे. मात्र, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांच्यासह मनीष लबडे, ऋषिकेश शेलार आणि बाळू ढवळे हे पारधी समाजाला जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या व्यक्तींमुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पारधी समाजाच्या हिताच्या कामांमध्ये अडथळे आणले जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधित व्यक्तींकडून वारंवार धमक्या दिल्या जात असून, गाव बंद करून तुमच्यावर खोटे गुन्हे दाखल करू, आमचे कोणीही काही करू शकत नाही, अशा प्रकारची भाषा वापरली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे आपल्या जीवितास धोका निर्माण झाला असून धमकीचे पुरावेही उपलब्ध असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अण्णासाहेब शेलार व त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा बेलवंडी येथील महाराष्ट्र शासनाच्या जागेवर २४ जुलैला आमरण उपोषण करणार असून गुन्हा दाखल नाही झाल्यास दुसऱ्या दिवशी बोंबाबोंब आंदोलन तसेच त्यानंतर समस्त आदिवासी पारधी समाजाचा आत्मदहन करण्यात येणार असल्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## विठाबाई किसनराव वैद्य यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी –**



अकोले तालुक्यातील सुगाव खुर्द येथील जुन्या पिढीतील विठाबाई किसनराव वैद्य (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने सोमवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी १० वाजता सुगाव खुर्द येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात निवृत्त मुख्याध्यापक बाबासाहेब किसनराव वैद्य, प्रगतशिल शेतकरी शिवाजी किसनराव वैद्य व प्राथमिक शिक्षक संभाजी किसनराव वैद्य ही मुले व दामोधर कारभारी वैद्य, दादापाटील कारभारी वैद्य, हरीभाऊ कारभारी वैद्य हे दीर व सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# जागा बदलली तरी नाट्यगृहाचे नाव बदलता कामा नये

### आ.आशुतोष काळेंचे कोपरगाव नगरपालिका प्रशासनाला स्पष्ट निर्देश

**● कोपरगाव । वीरभूमी –**

शहरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह उभारले जाणार आहे. त्या जागेचा करार शासनाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे यदाकदाचित नाट्यगृहाची जागा जरी बदलावी लागली तरी चालेल पण ज्या ठिकाणी नाट्यगृह होणार त्या नाट्यगृहाचे नाव बदलता कामा नये असे स्पष्ट निर्देश आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपालिका प्रशासनाला दिले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक लोकार्पण, नाट्यगृह आणि समाज मंदिर उभारणी आदी मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला गुरुवार (दि.१६) रोजी आ.आशुतोष काळे यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेवून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. यावेळी ते म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे लोकार्पण कधी आणि कशा पद्धतीने करायचे याचा निर्णय संपूर्ण समाज बांधवांनी एकत्रित बसून घ्यावा. लोकार्पण कार्यक्रम कधी घ्यायचा व कसा घ्यायचा याची रूपरेषा सांगा. सर्वानुमते होणारा हा निर्णय नगरपालिका प्रशासनाला कळवा. त्याप्रमाणे समाज बांधवांच्या मागणी प्रमाणेच नगरपालिका प्रशासन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचे लोकार्पण सोहळ्याची अंमलबजावणी करेल अशी ग्वाही आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी आंदोलनकर्त्यांना दिली.



■ छाया । जनार्दन जगताप

तसेच कोपरगाव शहरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य नाट्यगृहाच्या उभारणीसाठी ५ कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत ज्या जागेवर हे नाट्यगृह उभारण्याचे नियोजन करण्यात आहे त्या जागेच्या कराराची कायदेशीर प्रक्रिया सध्या शासनाकडे प्रलंबित आहे. शासनाकडून ही करार प्रक्रिया पूर्ण होताच नाट्यगृहाचे काम युद्धपातळीवर सुरू केले जाईल. त्याबाबत माझा पाठपुरावा सुरूच असून मुख्याधिकाऱ्यांना पण पाठपुरावा करण्यास सांगितले आहे.त्याबाबत समाज बांधवांनी देखील पालिकेकडे पाठपुरावा करावा.ज्या ठिकाणी नाट्यगृहासाठी जागा उपलब्ध होईल त्या ठिकाणी नाट्यगृह बांधा परंतु नाट्यगृहाच्या नावात कोणताही बदल न करता या नाट्यगृहाला साहित्यरत्न डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हेच नाव राहिले पाहिजे असे स्पष्ट निर्देश आ.आशुतोष काळे यांनी आंदोलनकर्त्यांच्या समक्ष कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजित निकट यांना दिले आहे. तसेच समाज बांधवांनी समाजमंदिरासाठी जी जागा अपेक्षित धरली आहे त्या जागेबाबत मुख्याधिकारी माहिती घेवून निश्चितपणे कार्यवाही करतील असे सांगितले.

यावेळी नितीन साबळे, अर्जुन मरसाळे, फकीरा चंदनशिव, अनिल पगारे, रवींद्र डोलारे, शरद त्रिभुवन, अनिल मरसाळे, रंगनाथ मरसाळे, तेजस साबळे, नितीन ताकवले, साई आवारे, संतोष मरसाळे, सिद्धेश खडांगळे, दीपक मरसाळे, ज्ञानेश्वर घोडेस्वार, किरण गायकवाड, सचिन अहिरे, विजय मरसाळे, पप्पू उगले, योगेश उशीर, साई चंदनशिव, नगरसेवक मंदार पहाडे, संदीप कपिले, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, हाजीमेहमूद सय्यद, विजय त्रिभुवन, रमेश गवळी, नितीश बोरुडे,सिद्धार्थ शेळके कोपरगाव नगरपालिका अधिकारी आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लेखक डॉ. आर. जी. सय्यद यांच्या पैगंबरी शृंखला आणि संतांचे सामाजिक योगदान' साहित्याचे प्रकाशन

**● पारनेर । वीरभूमी –**

संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आर. जी. सय्यद लिखित 'पैगंबरी शृंखला आणि संतांचे सामाजिक योगदान' या महत्त्वपूर्ण साहित्याचे प्रकाशन नुकतेच श्रीगोंदा येथील संत शेख महमंद महाराज यांच्या दर्गा प्रांगणात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले. ह.भ.प. सोपान औटी यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. संभाजीराव बोरुडे, ह.भ.प. पवार मामा, ह.भ.प. यासीन भाई, ह.भ.प. गुलाबभाई तांबोळी, मुकुंदराव सोनटक्के, ह.भ.प. लांडगे महाराज, ह.भ.प. दांडेकर महाराज, सामाजिक कार्यकर्ते बापू माने, विणेकरी तराळ यांच्यासह परिसरातील समस्त वारकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी या साहित्याची प्रस्तावना लिहिली आहे. डॉ. साळुंखे आपल्या मनोगतात म्हणतात की, अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेरचे रहिवासी असलेले डॉ. रफिक सय्यद यांचा इस्लाम आणि पवित्र कुराण यांचा जसा गाढा व्यासंग आहे, तसाच वारकरी संतांचा आणि विशेषतः संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचाही त्यांचा सखोल अभ्यास आहे. इस्लाममधील मुहंमद पैगंबर यांच्या चरित्रातील प्रभावी घटना आणि संत तुकारामांचे अभंग यातील समान विचारसूत्रे त्यांनी या पुस्तकात मांडली आहेत. समाजात वैचारिक आणि भावनिक समन्वय साधण्याच्या दृष्टीने हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या पुस्तकाचे कौतुक अनेक नामवंत विचारवंतांनी केले आहे. मारुती शेरकर (मिशन माणुसकी, मुंबई), कामाजी पवार (राष्ट्रीय अध्यक्ष, मराठा सेवा संघ), डॉ. बरकतुल्ला खाजा नाजीमोद्दीन (नांदेड) आणि डॉ. हरीश शेळके (मराठी विभाग प्रमुख, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर) यांनी या लेखनावर महत्त्वपूर्ण अभिप्राय नोंदवले आहेत. हे साहित्य धार्मिक, सामाजिक आणि नैतिक मूल्यांचा समन्वय साधणारे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

पुस्तकाविषयी बोलताना लेखक डॉ. आर. जी. सय्यद यांनी सांगितले की, आदर्श समाज निर्मितीसाठी आदर्श साहित्याची भूमिका अत्यावश्यक आहे. आपल्या देशाला, विशेषतः महाराष्ट्राला संत आणि सूफी परंपरेचा मोठा वारसा लाभला आहे. हे साहित्य केवळ मानवी नीती मूल्यांची जोपासना करत नाही, तर विविध धर्मीयांना बंधुत्वाच्या धाग्यात बांधून राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्यास मदत करते. महापुरुषांचे हे विचार साध्या-सोप्या भाषेत जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. विविध धर्मांतील समान विचारांची मांडणी आणि त्यातून निर्माण होणारा सलोखा यामुळे या पुस्तकाचे सर्वच स्तरांतून मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे.

## जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त स्नेहालयमध्ये प्रमाणपत्र वितरण समारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**




कौशल्य हेच भविष्य! या घोषवाक्याने मुथा सभागृह दुमदुमून गेले असताना स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल आणि स्नेहालय कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा कौशल्य दिन व प्रमाणपत्र वितरण समारंभ दिनांक १५ जुलै २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उमेश चंद्रकांत रेखे यांच्या हस्ते विविध कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी मिलिंद भद्रे, हनीफ शेख, शितल गुंदेचा, मंदा हांडे आणि प्रीती ठिक्कर यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या दोन नाटिकांनी उपस्थितांची मने जिंकली. पुस्तकी ज्ञानाबरोबर कौशल्यही तितकेच महत्त्वाचे आहे हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. अनेक विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणातील अनुभव कथन करत कौशल्यामुळे आयुष्याला नवी दिशा मिळाल्याचे सांगितले. सागर दोंदे यांनी प्रास्ताविकातून स्नेहालय कौशल्य विकास केंद्राच्या विविध प्रशिक्षण उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थिनी भक्ती उल्हारे हिने सूत्रसंचालन करून कार्यक्रमात रंगत आणली.

प्रमुख पाहुणे उमेश रेखे यांनी विद्यार्थ्यांना फक्त नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे बना, असा प्रेरणादायी संदेश दिला. उपस्थित मान्यवरांनीही कौशल्याधारित शिक्षणाची गरज अधोरेखित करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी नवनाथ उंडे सर यांनी आभार मानले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या समारंभातून कौशल्य हेच सामर्थ्य, कौशल्य हेच भविष्य हा संदेश प्रभावीपणे सर्वांपर्यंत पोहोचला.

## ऐतिहासिक बारव संवर्धनासाठी संरक्षक भिंत उभारण्याची नगरसेवक देवा पवार यांची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरातील चिंचपूर रोड परिसरातील शहराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा असलेल्या पुरातन बारवाच्या संवर्धनासाठी तातडीने संरक्षणात्मक भिंत व इतर उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी नगरसेवक देवा पवार यांनी पाथर्डी नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या बारवा शहरासाठी फक्त जिवंत जलस्रोत नव्हत्या तर त्या काळातील समृद्ध शहराच्या खुणा असुन शहरातील अनेक पिढ्यांचा इतिहास पाहिलेल्या मुक साक्षीदार आहेत. अनेक पिढ्यांच्या भावना या वास्तु बरोबर जोडलेल्या आहेत. या बारवाभोवती मजबूत संरक्षक भिंत, लोखंडी गेट आणि माहिती फलक उभारून या ऐतिहासिक वास्तूचे जतन करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. यावेळी माजी उपनगराध्यक्ष व नगरसेवक बजरंग घोडके उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, चिंचपूर रोड परिसरातील ही ऐतिहासिक बारव शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे प्रतीक असून अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. मात्र, बारवाभोवती कोणतीही संरक्षक भिंत नसल्याने व ती मोठ्या प्रमाणावर वाहतुक असलेल्या रस्त्यालगत आहे त्यामुळे नागरिक, लहान मुले तसेच जनावरांकडून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय काही ठिकाणी कचरा टाकणे, अतिक्रमण करणे अशा प्रकारांमुळे या ऐतिहासिक वास्तूचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. त्या बारवेची नुकतीच साफसफाई करून तीला पुर्नजीवन देण्यात आले आहे.बारवाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन तिचे संवर्धन आणि संरक्षण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नगरसेवक देवा पवार यांनी नमूद केले आहे. यासाठी बारवाभोवती मजबूत संरक्षक भिंत उभारणे, सुरक्षिततेच्या दृष्टीने लोखंडी गेट बसविणे तसेच बारवाचा इतिहास आणि महत्त्व सांगणारा माहिती फलक उभारण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन ऐतिहासिक बारवाच्या संरक्षणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून तातडीने काम हाती घ्यावे, अशी अपेक्षा नगरसेवक देवा पवार व बजरंग घोडके यांनी व्यक्त केली आहे.



■ छाया । अनिल खाटेर

# मंदिरांसह ज्ञानमंदिरांनाही दान द्या : डॉ. दत्तात्रय आहेर

### शिंदेवाडी (गणोरे) शाळेला ५१ हजारांची देणगी । वृक्षारोपण, रोपवाटप व 'एका झाडाचे पालकत्व' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**● संगमनेर । वीरभूमी –**

अध्यात्मिक श्रद्धेपोटी जसे आपण मंदिरांना दान देतो, त्याचप्रमाणे उद्याचा सुजाण नागरिक घडवणाऱ्या ज्ञानमंदिरांनाही सढळ हस्ते दान दिले पाहिजे. शाळा सक्षम झाल्या तरच देश खऱ्या अर्थाने सामर्थ्यसंपन्न बनेल, असे प्रतिपादन संगमनेर येथील अंबिका मुळव्याध व भगंदर क्लिनिकचे संचालक डॉ. दत्तात्रय आहेर यांनी केले.

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी (गणोरे) येथे आयोजित वृक्षारोपण व देणगी प्रदान समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड होते. प्रमुख अतिथी म्हणून संगमनेर रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग, डॉ. रेखा आहेर, सरपंच संतोष आंबरे, मारुती आहेर, अशोक आहेर, राजेंद्र आंबरे, दिगंबर दातीर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी अनिल गायकवाड यांच्या हस्ते डॉ. आहेर यांचा सत्कार करण्यात आला.

समाजाप्रती आपली जबाबदारी जपत आणि माजी विद्यार्थी म्हणून शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून डॉ. दत्तात्रय आहेर यांनी शिंदेवाडी शाळेच्या विकासासाठी ५१ हजार रुपयांची देणगी जाहीर करून सुपूर्द केली. माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक एकत्र आल्यास कोणत्याही शाळेचा कायापालट होऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण शिंदेवाडी शाळेने घालून दिल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मालपाणी नर्सरी यांच्या देणगीतून प्राप्त झालेल्या विविध वृक्षांच्या रोपांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता प्रत्येक विद्यार्थी आणि पालकाने एका झाडाचे पालकत्व स्वीकारून त्याच्या संगोपनाची जबाबदारी घेण्याची शपथ घेतली.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे सांगत, झाडे लावा, झाडे जगवा हा संदेश प्रत्येकाने आचरणात आणावा, असे आवाहन केले.

प्रास्ताविकात उपक्रमशील मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी शाळेच्या प्रगतीचा व झालेल्या कायापालटाचा आढावा घेतला. शाळेला वस्तूरूप, रोख देणगी व विशेष निधीच्या माध्यमातून मदत करणाऱ्या सर्व दानशूर व्यक्तींचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी अरविंद आहेर, राजाराम आहेर, शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रय हांडे, संतोष भालेराव, गणेश भालेराव, श्रीकांत खतोडे, विशाल आंबरे, रावसाहेब दातीर, आकाश आंबरे, योगेश दातीर, अशोक दातीर, दत्तात्रय आंबरे, सागर चव्हाण, गोरख आहेर, प्रवीण मालुंजकर, संजय आंबरे, विवेक दातीर, वाळीबा खतोडे, प्रियंका हांडे, सुवर्णा खतोडे, शितल आंबरे, अक्षदा आंबरे, प्रियंका आहेर, ज्योती आंबरे, माया आंबरे, अनिता हांडे, मीनाक्षी हांडे, अश्विनी दातीर, उज्वला हांडे, संजीवनी दातीर, मोहिनी शिंदे आदींसह पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिक्षिका कल्पना पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमानंतर हरितक्रांती उपक्रमांतर्गत वृक्षलागवड करण्यात आली तसेच विद्यार्थी व पालकांना विविध वृक्षांची रोपे वाटप करण्यात आली. शेवटी शालेय पोषण आहाराचे काम पाहणाऱ्या अनिता हांडे यांच्या वतीने उपस्थितांना अल्पोपहार व खाऊचे वाटप करण्यात आले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# सोनम वांगचूक यांच्या दिल्लीतील आंदोलनाला श्रीगोंद्यातून पाठिंबा

## पेपरफुटीला जबाबदार कोण? धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी । महाविकास आघाडी व सामाजिक कार्यकर्त्यांचे तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

देशातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला धक्का देणाऱ्या कथित पेपरफुटी घटनांच्या पार्श्वभूमीवर आणि दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या १९ दिवसांपासून उपोषणास बसलेल्या ज्येष्ठ शास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरण संशोधक सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवित श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर गुरुवारी महाविकास आघाडी, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकशाहीवादी विचारांच्या नागरिकांच्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

कॉंकरोज जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांच्या धरणे आंदोलनस्थळी झालेल्या या आंदोलनात नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन तहसील प्रशासनामार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यासाठी सादर करण्यात आले.

यावेळी विविध वक्त्यांनी सांगितले की, २०१४ नंतर देशात विविध प्रवेश व भरती परीक्षांमधील पेपरफुटी आणि परीक्षा गैरव्यवहारांच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर परिणाम झाला आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीनंतरही विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणे, अनिश्चिततेला सामोरे जावे लागणे, स्पर्धा परीक्षांवरील विश्वास कमी होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण व्यवस्था ही केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा नसून ती सामाजिक न्याय, समान संधी आणि गुणवत्तेच्या आधारे प्रगतीची हमी देणारी व्यवस्था आहे. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता निर्माण करण्याची गरज आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

दिल्ली येथे उपोषणास बसलेल्या सोनम वांगचूक यांनी शिक्षण व्यवस्था, लोकशाही मूल्ये आणि लडाखच्या प्रश्नांकडे देशाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असल्याचे वक्त्यांनी सांगितले. त्यांच्या आंदोलनाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने पाहावे आणि संवादाच्या माध्यमातून तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

लाक्षणिक उपोषण ॲड. राजेंद्र निळकंठ नागवडे, अरविंद कापसे, स्मितल वाबळे, उद्धव गायकवाड यांनी प्रातिनिधिक केले तर


■ छाया । विजय उंडे

ज्येष्ठ शेतकरी नेते अनिल घनवट यांच्यासह राजेंद्र म्हस्के, अनिल कोकाटे, ॲड. समित बोरुडे, विलास वाघमारे, शांताराम पोटे, श्रीकांत ठवाळ, राहुल छत्तीसे, ॲड. अजय कडूस आणि शिवप्रसाद उबाळे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आपले मनोगत व्यक्त केले. नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांनी निवेदन स्वीकारले.

यावेळी प्रा. राजेश बारहाते, धनंजय औटी, आदिल शेख, दत्तात्रय जंगले, ॲड. जयंत शिंदे अक्षय ससाणे, वसीम ताडे, गणेश उंडे, विजय हरिहर, विकास सुडगे, गोरख कडूस, प्रा. बापूसाहेब गायकवाड, संतोष पवार आणि किरण बाबर यांच्यासह अनेक नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आंदोलनातील प्रमुख मागण्या

■ नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता व उत्तरदायित्व निश्चित करणे, पेपरफुटी आणि परीक्षा गैरव्यवहारांवर कठोर कारवाई, स्वायत्त संस्थांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण तसेच सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाची दखल घेऊन संवादातून तोडगा काढणे व देशातील शिक्षण व्यवस्था, लोकशाही संस्था आणि संविधानिक मूल्यांचे संरक्षण ही केवळ सरकारची नव्हे तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

# सोनम वांगचुक यांच्या दिल्लीतील आंदोलनाला पारनेर तालुक्यामधून पुरोगामी संघटनांचा पाठिंबा

**● पारनेर । वीरभूमी –**

लडाखचे संरक्षण आणि संवैधानिक हक्कांसाठी नवी दिल्लीत आमरण उपोषण करत असलेले प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि समाजसुधारक सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पारनेर तालुक्यातील पुरोगामी चळवळीतील विविध संघटनांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. यासंदर्भात आज शुक्रवारी तहसीलदार कार्यालयात नायब तहसीलदार दिपक कारखिले यांना निवेदन देण्यात आले.


■ छाया । भगवान गायकवाड

सोनम वांगचुक यांनी भारतीय लष्करासाठी कडाक्याच्या थंडीत वापरण्यायोग्य 'इको-फ्रेंडली टेंट' विकसित करून देशाच्या संरक्षणात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. लडाखमधील शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या वांगचुक यांना आशियातील प्रतिष्ठेच्या 'मॅगसेस पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले आहे. सध्या ते लडाखला राज्याचा दर्जा मिळावा, राज्यघटनेच्या सहाव्या सूचीचा समावेश करावा आणि नीट परीक्षेतील पेपर फुटीसारख्या गंभीर गैरव्यवहारांविरोधात कडक कारवाई व्हावी, या मागण्यांसाठी जंतर-मंतर येथे आमरण उपोषणाला बसले आहेत.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, आंदोलनाचे वीस दिवस उलटूनही केंद्र सरकारने अद्याप कोणतीही दखल घेतली नाही. यामुळे वांगचुक यांची प्रकृती चिंताजनक झाली असून, सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून जीव धोक्यात घालत असल्याचा संशय उपस्थित करण्यात आला आहे. वांगचुक यांच्या मागण्या रास्त असून त्या सरकारने तत्काळ मान्य कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

सोनम वांगचुक यांच्या मागण्या मान्य न झाल्यास आणि त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्यास पारनेर तालुक्यात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा या वेळी देण्यात आला.

या निवेदनावर युनिटी ऑफ मूलनिवासी समाज संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पातारे, आरपीआय (निकाळजे गट) तालुकाध्यक्ष किरण सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते अमित जाधव, युवा अध्यक्ष (निकाळजे गट) अजय साळवे, अमोल ठुबे, प्रदीप कसबे, दिपक साळवे, अशोक जाधव, संतोष गोरे, मंगेश पडवळ, भरत सोनवणे, कुणाल खुपटे, यश साळवे, हरिभाऊ अडसूळ, सागर बोरुडे आणि राजु उघडे आदी कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# मतदार पुनरिक्षण मोहिमेत कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे

## ना. राधाकृष्ण विखे पाटील । पाथर्डी-शेवगाव मतदारसंघातील मोहिमेचा घेतला आढावा

**● शेवगाव । वीरभूमी–**

मतदार यादीच्या सखोल पुनरिक्षण मोहिमेला भविष्याच्या दृष्टीने मोठे महत्त्व असून, सरकारी स्तरावर काम सुरू असले तरी संघटनात्मक पातळीवर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथप्रमुखांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पाथर्डी-शेवगाव विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी सखोल पुनरिक्षण मोहिमेचा आढावा ना. विखे पाटील यांनी घेतला. यावेळी आमदार मोनिका राजळे, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, विनायक देशमुख तसेच मोहिमेसाठी नियुक्त पक्षाचे प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांच्या प्रश्नांचे निरसन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी केले.



आतापर्यंत मतदारसंघात १ लाख ७१ हजार अर्जांचे वितरण झाले असून, आता अर्ज भरून घेण्याच्या प्रक्रियेला गती देण्याची आवश्यकता असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले. सरकारी यंत्रणेच्या बरोबरीने संघटनात्मक पातळीवर अधिक प्रभावीपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

देशातील २२ राज्यांत ही मोहीम सुरू असल्याचे नमूद करताना, या प्रक्रियेमुळे कोणत्याही पात्र मतदारावर अन्याय होणार नसून दुबार नावे तसेच खोटी माहिती देऊन मतदार यादीत समाविष्ट झालेल्यांची नावे वगळण्याची संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पश्चिम बंगालमध्ये ही मोहीम राबविल्यानंतर मतदार यादीतील घुसखोर समोर आल्याचा दावा करत, पुनरिक्षणामुळे तेथील ९१ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

सन २००२ पासून मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या नोंदींची पडताळणी होत असून, गाव, प्रभाग आणि बूथ स्तरावर लक्ष केंद्रित करून ही मोहीम यशस्वी करण्याची जबाबदारी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथप्रमुखांची असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

मतदार यादी सखोल पुनरिक्षण मोहिमेचा फायदा भविष्यात निश्चित दिसून येईल. ही मोहीम पुन्हा केव्हा होईल, हे निश्चित नसल्याने सर्वांनी गांभीर्याने सहभागी होऊन योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# शिराळच्या यशवंत विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

## वृक्षारोपण, गुणवंतांचा गौरव आणि शाळेच्या विकासासाठी पालकांचे सहकार्य

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील शिराळ येथील यशवंत विद्यालयात नुकताच पालक-शिक्षक मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.


■ छाया । अनिल खाटेर

कार्यक्रमाला वृक्षप्रेमी शंकरराव कन्हेरकर, डॉ. शिवाजीराव घोरपडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल वाघ, सुवर्णाताई रवींद्र मुळे, पंढरीनाथ मुळे, मेजर मिठू मुळे तसेच शिक्षणप्रेमी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक नानासाहेब काळे होते.

मुख्याध्यापक नानासाहेब काळे यांनी शाळेतील भौतिक सुविधा उभारणीसाठी पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला पालकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

विद्यालयातील मागील वर्षातील विविध स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक यशाचा आढावा ज्येष्ठ शिक्षक रविंद्र ज्योतिक यांनी सादर केला. शिक्षक मनोगतात राजश्री दुशिंग यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वयाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता घुणे यांनी केले, तर आभार सीमा ठाकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख दगडखैर सर, शेख सर, झिने सर, भापकर सर, ग्रंथपाल दरेकर सर, लिपिक आनंद साळवे तसेच शिक्षकेतर कर्मचारी अशोक मुळे यांनी परिश्रम घेतले.

यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल शंकरराव कन्हेरकर यांचा मुख्याध्यापक नानासाहेब काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# रेशनिंग धान्यापासून सर्वसामान्य वंचित राहू नये, दक्षता घ्या : ग्राहक पंचायत

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले आदिवासी तालुक्यामध्ये मे-जून महिन्याचे रेशनिंगचे धान्य वाहतुकीच्या नावाखाली उशिरा पोहचले व जुलै महिन्याचे ही उशिरा पोहचत आसल्याबाबत यामुळे सर्वसामान्य नागरिक 'ग्राहक' धान्या पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्या बाबतचे निवेदन अकोले तालुक्याचे नायब निवासी तहसिलदार किसन लोहरे यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले आदिवासी तालुक्यामध्ये रेशनिंगचे धान्य मे, जून, महिन्यामधील धान्य वाहतुकीच्या नावा खाली उशिरा बऱ्याच भागामध्ये पोहचले आणि आता ही जूलै महिन्याचे धान्य अद्याप पर्यंत बऱ्याच भागामध्ये आजून पोहचले नाही.

बीपीएल, अंत्योदय, अन्नपुर्णा, प्राधान्यक्रम हे सामान्य ग्राहक, नागरिक रेशनिंग धान्यापासून वंचित राहू नये.आदिवासी भागातील सर्वात लांबच्या व पाऊस,अतीवृष्टी मधिल गावात सर्वात पहिले रेशनिंगचे धान्य पोहच झाले पाहिजे. बीपीएल, अंत्योदय,अन्नपूर्णा, प्राधान्यक्रम रेशनिंग धान्य वाहतुकीचे साधने गाड्या या मध्ये वाढ करण्यात यावी. रेशनिंग धान्य वाहतूक एजन्सी, ठेकेदार व त्यांच्या मार्फत रेशनिंग धान्य वाहतूक नेमलेले ठेकेदार हे शासनाने ठरऊन दिलेल्या नियमाचे, नियमावलीचे पालन करीत नसल्यास त्यांना नोटीस पत्र व्यवहार अन्यथा काळ्या यादीत टाकावे.वरील सर्व बाबींकडे लक्ष घालून सर्व



सामान्य ग्राहक रेशनिंग धान्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता,दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छींद्र मंडलीक, सचिव राम रुद्रे, माधवराव तिटमे रामदास पांडे, रजनीकांत भांगरे, ज्ञानेश्वर पुंडे, अर्जुन वैद्य, अनंत घाणे, रामदास पवार, अशोक उघडे, गंगाराम धिंदळे तालुका अध्यक्ष दत्ता शेनकर, राजेंद्र घायवट, भाऊसाहेब वाकचौरे प्रा.डॉ. सुनिल शिंदे, जालिंदर बोडके, गंगाराम धिंदळे, शांताराम दराडे,मोहन मुंढे, सुरेश गभाले, सखाराम खतोडे, राजेंद्र लहामगे, रामहरी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, भाऊसाहेब आभाळे, दत्तात्रय मुठे, प्रदीप हासे, कैलास तळेकर, प्रमोद मंडलिक, भगवान करवर, पांडुरंग पथवे, दत्ता ताजणे, सुदाम मंडलिक आदींचे नावे आहे.

# शेवगाव-पाथर्डीच्या पाणीटंचाईवर प्रभावी उपायासाठी ताजनापूर योजनेसाठी २५० कोटी

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । बंधारे-तलाव दुरुस्तीसाठी साडेसहा कोटींची तरतूद । टँकरद्वारे पारदर्शक पाणीपुरवठ्याचे निर्देश

**● शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी ताजनापूर टप्पा क्रमांक १ योजनेसाठी २५० कोटी रुपयांचा निधी तसेच बंधारे व तलावांच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेसहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. अमरापूर येथील श्री लॉन्स येथे आयोजित शेवगाव-पाथर्डी तालुक्याच्या टंचाई आढावा व समन्वय बैठकीत ते बोलत होते.

बैठकीत शेवगाव शहर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या व प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर दोन्ही तालुक्यांमध्ये टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

यावेळी आमदार मोनिकाताई राजळे यांनी शेवगाव-पाथर्डी हा कायमस्वरूपी दुष्काळी भाग असल्याने राज्यातील नदीजोड प्रकल्पामध्ये या भागासाठी स्वतंत्र पाणी आरक्षित ठेवण्याची मागणी केली. मागील वर्षीच्या अतिवृष्टीत नुकसान झालेल्या साठवण बंधारे व तलावांच्या दुरुस्तीसाठी साडेसहा कोटी रुपयांचा निधी, ताजनापूर उपसा सिंचन योजना क्रमांक १ व २ साठी निधी, मुळा पाटबंधारे योजनेचे पाणी शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कालव्यांची दुरुस्ती तसेच पावसाळा लांबल्यास आवश्यक गावांमध्ये तातडीने टँकर उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, 'अल निनो'च्या प्रभावामुळे पावसाळा लांबल्याने टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

ते पुढे म्हणाले की, महायुती सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात शेतकरीहिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. आमदार मोनिकाताई राजळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेवगाव तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या ताजनापूर टप्पा क्रमांक १ योजनेसाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येत आहे. तसेच शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील बंधारे व तलावांच्या दुरुस्तीसाठी सुमारे साडेसहा कोटी रुपयांची तरतूदही लवकरच करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिलासा दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.


■ छाया । अमोल कराळे

बैठकीस उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, तहसीलदार उद्धव नाईक, गटविकास अधिकारी सोनल शहा, राजेंद्र धस, मुख्याधिकारी विजया गाडगे (शेवगाव), मुख्याधिकारी संतोष लांडगे (पाथर्डी), भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, जिल्हा परिषद सदस्य राहुलदादा राजळे, बापूसाहेब भोसले, जिल्हा समन्वयक विनायक देशमुख, गणेश भालसिंग, विधानसभा समन्वयक नारायण पालवे, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, नगराध्यक्ष अभय काका आव्हाड, भाजपा मंडलाध्यक्ष महेश फलके, धनंजय बडे, संजय टाकळकर, माजी नगराध्यक्ष मृत्युंजय गर्जे, अजय रक्ताटे, भीमराज सागडे, युवराज नरवडे, उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे, आशाताई गरड तसेच शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील भाजपाचे नगरसेवक, सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधानसभा समन्वयक नारायण पालवे यांनी केले. सूत्रसंचालन सुरेश बाबर व राजेंद्र सुरवसे यांनी केले, तर आभार मार्केट कमिटीचे सभापती सुभाष बर्डे यांनी मानले.